१०. शपथेवर निवेदन करते की, वरील सरतपासातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला असून तो खरा व बरोबर आहे. त्यावर मी सही केली आहे. नि.क्र.४ वरील यादीअन्वये मौजे कोकबन येथील गट क्र.१५३/ब/७ च्या सातबारा उताऱ्याची प्रत दाखल केली आहे त्यास **नि.क्र.३४** देण्यात येतो. याच यादीअन्वये गट क्र.१५३ च्या गट फोड नकाशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे त्यास नि.क्र. **३५** देण्यात येतो. याच यादीअन्वये गट एकत्रीकरण पत्रकाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे त्यास नि.क्र.**३६** देण्यात येतो. याच यादीअन्वये वाद मिळकतीचा हात नकाशा दाखल केला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास वस्तू 'अ' देण्यात येतो. मी ॲड. सानप यांच्यामार्फत दि.१३.६.२०१७ रोजी प्रतिवादींना पाठविलेल्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर ॲड.सानप यांची सही आहे त्यास **नि.क्र.३७** देण्यात येतो. याच यादी अन्वये नोटीस प्राप्त झाल्याबाबत पोस्टाच्या पोचपावत्या दाखल केल्या आहेत. त्यावर संबंधीत प्रतिवादींच्या सह्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.३८ व ३९** देण्यात येतो. मी कोकबन ग्रामपंचायतीस ॲड. सानप यांच्या मार्फत दिलेल्या दि.२८.८.२०१७ रोजीच्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर ॲड. सानप व माझी सही आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येतो. याच यादीअन्वये दोन छायाचित्रे दाखल केली आहेत त्यांना अनुक्रमे **वस्तू 'ब'** आणि **वस्तू 'क'** देण्यात येतो. नि.क्र.११ वरील यादीअन्वये घर क्र.३२९ कोकबनचा ॲसेसमेंट उतारा दाखल केला आहे. त्यावर ग्रामसेवक यांची सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येतो. नि.क्र.१७ वरील यादीअन्वये छायाचित्र दाखल केली

आहेत. त्यास **वस्तू 'ड'** देण्यात येतो. नि.क्र.२४ वरील यादीअन्वये ग्रामसेवक कोकबन यांनी प्रतिवादींना दिलेल्या नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.४२** देण्यात येतो. नि.क्र.२६ वरील यादीअन्वये मी सरपंच/ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत कोकबन यांना दिलेल्या दि.२९.५.२०१७ रोजीच्या अर्जाची प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. तसेच पोच म्हणून ग्रामसेवक यांची सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र.४३** देण्यात येतो. नि.क्र.३३ वरील यादीअन्वये माझ्या पतीने माझ्या हक्कात केलेले दावा मिळकती संदर्भातील मूळ अखत्यारपत्र दाखल केले आहे. ते अखत्यारपत्र भारतीय दुतावास दोहा, कतार येथे करण्यात आले. त्यानंतर तो ॲड. एन.जी.देशमुख यांच्या समक्ष नोटरी करण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझ्या पतीची सही व छायाचित्र आहे. तसेच त्यावर माझी सही व छायाचित्र आहे. त्यास **नि.क्र.४४** देण्यात येतो.

सरतपास पूर्ण.

उलटतपास प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2020.03.13 15:48:56 +0000

दि.१३.०३.२०२०

(स. दि. कमलाकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रोहा.